पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १७८**

(सभावृत्तांत)

**दिनांक – ०१/०७/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार दि.०१/०७/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**

२. मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.सभापती**– सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने सदरची सभा बुधवार दिनांक ०८/०७/२०२० रोजी दुपारी २.१५ वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १७८**

(सभावृत्तांत)

( दिनांक ०१/०७/२०२० ची तहकूब सभा )

**दिनांक – ०८/०७/२०२०** **वेळ – दु. ०२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक **०१/०७/२०२० ची** तहकूब सभा बुधवार दिनांक **०८/०७/२०२०** रोजी दु.**०२.१५** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे मयूर पांडुरंग
७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोष बबन कांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.तुपे – प्र.अति. आयुक्त (३) तथा सह शहर अभियंता, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पाटील – शहर अभियंता, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.गलबले – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा. राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

विद्यमान नगरसदस्य दत्ता (काका) साने, माजी आमदार व माजी महापौर श्री.विलासराव लांडे यांचे वडील विठोबा लांडे, माजी नगरसेवक संजय साळवी व माजी नगरसेवक वसंत (नाना) लोंढे यांचे चिरंजीव महेश वसंतराव लोंढे यांचे नुकतेच दु:खद निधन झाले आहे. आजच्या सभेत त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत येवून शुक्रवार दि.०८/०७/२०१९ ची मा.स्थायी समितीची सभा शुक्रवार दि.१०/०७/२०२० रोजी दु.०२.१५ वा. पर्यंत तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

**सभापती -** बुधवार दि.०८/०७/२०२० ची मा.स्थायी समितीची सभा शुक्रवार दि.१०/०७/२०२० रोजी दु.०२.१५ वा. पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १७८**

(सभावृत्तांत)

( दिनांक ०१/०७/२०२० व दि.०८/०७/२०२० दु.२.१५ ची तहकूब सभा )

**दिनांक – १०/०७/२०२०** **वेळ – दु. ०२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक **०८/०७/२०२० ची** दु.२.१५ ची **तहकूब** सभा शुक्रवार दिनांक **१०/०७/२०२०** रोजी दु.**०२.१५** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत सन्मा. सदस्य आणि संबंधित अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
५. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
६. मा.संतोष बबन कांबळे
७. मा.अभिषेक गोविंद बारणे
८. मा.बुर्डे सुवर्णा विकास
९. मा.फुगे भिमाबाई पोपट

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.तुपे – सह शहर अभि. तथा प्र.अति.आयुक्त(३), मा.उल्हास जगताप - नगरसचिव हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.लोणकर, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – प्र.मुख्य उद्यान अधिक्षक, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग) मा.पाटील – प्राचार्य औ.प्र.केंद्र, मा.डॉ.साळवे – अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.जुंधारे, मा.गलबले – कार्यकारी अभियंता, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते

----------

दिनांक २४/०६/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१७७) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक – ७१९९ विषय क्रमांक – १
दिनांक – १०/०७/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.YCMH/भांडार/६/कावि/१२२/२०२०, दि.२९/०४/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या प्रयोगशाळा विभागाच्या मागणीनुसार त्यांचे विभागातील TB Culture System – Model – MGIT 960 या उपकरणाचे CMC करणेकामी संबंधित उत्पादित कंपनी M/s.Becton Dickinson India Private Limited, Gurgaon यांनी दर कमी करुन सादर केलेले र.रु.३,१५,४४९/- (अक्षरी र.रु.तीन लाख पंधरा हजार चारशे एकोणपन्नास फक्त) चे दरपत्रक स्विकृत करणेत आले आहे. त्यानुसार प्रयोगशाळा विभागातील TB Culture System – Model – MGIT960 चे CMC संबंधित उत्पादित कंपनी M/s.Becton Dickinson India Private Limited, Gurgaon यांचेकडून निविदा न मागविता, करारनामा करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची प्रकरण ५(२) (२) नुसार थेट पध्दतीने करणेस व सदर CMC करणेकामी होणारा खर्च एकूण र.रु.३,१५,४४९/- (अक्षरी र.रु.तीन लाख पंधरा हजार चारशे एकोणपन्नास फक्त) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२०० विषय क्रमांक – २
दिनांक – १०/०७/२०२० विभाग – मध्य.सा.भां. वैद्य.
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मसाभां/५/कावि/२६२/२०२०, दि.०८/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

कोविड-१९ जैव वैद्यकीय कचरा गोळा करणे आणि त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याच्या खर्चाबाबत मे.पास्को इनव्हायरमेंटल सोल्यूशन प्रा.लि., यांनी दिलेल्या प्रस्तावास अधिन राहून माहे मार्च २०२० मध्ये १, माहे एप्रिल मध्ये १० व माहे मे २०२० मध्ये १६ ठिकाणांहुन कोविड-१९ जैव वैद्यकीय कचरा वाहतुक केलेला आहे.(या ठिकाणांव्यतिरिक्त कचरा वाहतुकीचे ठिकाणांमध्ये वाढ होवू शकते) त्याप्रमाणे प्रति ठिकाण प्रति महा र.रु.१५,०००/- हे फिक्स चार्जेस वाहतुकीसाठी असे एकूण र.रु.४,०५,०००/- अधिक कोव्हीड- १९ कचरा निर्मूलन साठी र.रु.१००/- प्रति किलो प्रमाणे माहे मार्च २०२० ते माहे मे २०२० या कालावधीमध्ये जमा केलेला कोविड-१९ जैव वैद्यकीय कचरा एकूण ६,७०४.४३५ Kg करीता एकूण र.रु.६,७०,४४४/- असा एकूण खर्च र.रु.१०,७५,४४४/- (अक्षरी र.रू.दहा लाख पंच्याहत्तर हजार चारशे चव्वेचाळीस फक्त) तसेच माहे जुन २०२० पासून प्रति ठिकाण प्रति महा र.रु.१५,०००/- हे फिक्स चार्जेस वाहतुकीसाठी व कोव्हीड - १९ कचरा निर्मूलन साठी रु.१००/- प्रति किलो प्रमाणे येणा-या प्रत्यक्ष खर्चास महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) नुसार मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची

मागणी असली तरी, प्रस्तुत कामासाठी र.रू.१०,७५,४४४/- (अक्षरी र.रू.दहा लाख पंच्याहत्तर हजार चारशे चव्वेचाळीस फक्त) पर्यंतचे खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच जून २०२० पासूनचे पुढील खर्चास मान्यतेबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२०१ विषय क्रमांक – ३

दिनांक – १०/०७/२०२० विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/८/कावि/४२६/२०२०, दि.२६/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.४/०१/२०१९-२० सन २०१९-२० करिता अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध ठिकाणच्या उंच पाण्याच्या टाक्यांवरून वाल्व्ह ऑपरेशन व्यवस्थापन करणेकरिता मजूर कर्मचारी व मनपा टॅंकर साठी ड्रायव्हर पुरविणे या कामासाठी निविदा र.रू.६७,५३,६००/- (अक्षरी र.रू.सदुसष्ठ लाख त्रेपन्न हजार सहाशे फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीअल टेस्टिंग चार्जेस रक्कम वगळून निविदा र.रु.६७,५३,६००/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम मे.श्री शुभम उद्योग या ठेकेदाराकडून र.रु.६७,५३,६००/- पेक्षा सुधारित दर -१.८२% कमी दराची म्हणजेच र.रू.६६,३०,६८४/- रॉयल्टीची र.रु.०/-, मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- = एकूण र.रु.६६,३०,६८४/-पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार वेळोवेळी कामगार कल्याण विभाग यांचेकडील परिपत्रकानुसार प्रसिद्ध होणारे किमान वेतन दर यांचे नुसार वाढ/घट अदा करणेस व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस भाववाढ कलमानुसार निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२०२ विषय क्रमांक – ४

दिनांक – १०/०७/२०२० विभाग– आकाशचिन्ह व परवाना

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचेकडील पत्र क्र.आप/७/कावि/१४८/२०२०, दि.११/०३/२०२०

विषय – निविदा क्र.१/१ ते १३८/२०१९-२० मधील प्राप्त निविदा दरास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणेबाबत.

विषय क्र.४ दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२०३ विषय क्रमांक – ५

दिनांक – १०/०७/२०२० विभाग– वैद्यकिय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचेकडील पत्र क्र..मसाभा/४/कावि/४३८/२०२०, दि.१९/०६/२०२०

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये कोरोना बाधित व संशयित रुग्ण आढळुन येत आहेत. कोरोना बाधित व संशयित रुग्णांपासून रोगाचा प्रसार थांबविणे व त्वरीत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. कोरोना १९ मुळे अत्यव्यस्थेत असल्याची लक्षणे वेळीच समजण्यासाठी मा.आयुक्त, मा.सहा.आयुक्त (जनता संपर्क) व मा.अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे एकत्रीत झालेल्या चर्चेनुसार नागरीकांमध्ये जनजागृती होणेकामी महानगरपालीकेच्या सर्व प्रभाग क्षेत्रामध्ये प्रमुख ठिकाणी फ्लेक्स लावणेत यावे असे निश्चित करणेत आलेले आहे. मा.आयुक्त यांचेकडील दि.२८.०५.२०२० चे मान्य प्रस्तावान्वये १ दिवसाची जाहिर नोटीस प्रसीध्द करणेत आलेली होती. सदर नोटीसीची मुदत दि.०२.०६.२०२० दुपारी ३ वाजेपर्यंत ठेवणेत आलेली होती. मुदती नंतर एकूण चार निविदाकांरानी दरपत्रक सादर केले होते. दरपत्रक दि.०३.०६.२०२० रोजी उघडले असता त्यामध्ये मे.वाव्हळकर एन्टरप्राईजेस यांचे दर लघुत्तम र.रु.९.८० सर्व खर्चासहीत प्र.चौ.फूट या प्रमाणे प्राप्त झालेले आहेत. त्यांचेकडून काम करुन घेणेस एकूण र.रु.७,८४,०००/- एवढा खर्च येणार आहे. त्यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.२६% ने कमी प्राप्त झालेले आहेत.लघुत्तम निविदाधारक मे.वाव्हळकर एन्टरप्राईजेस यांना र.रु.७,८४,०००/- चे दर स्विकृत करणेत आलेले आहेत. मे.वाव्हळकर एन्टरप्राइजेस यांना र.रु.७,८४,०००/- (अक्षरी र.रू.सात लाख चौ-याऐंशी हजार फक्त) पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत. सदर खर्चास व संबंधीतांशी कार्योत्तर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२०४ विषय क्रमांक – ६

दिनांक – १०/०७/२०२० विभाग– विद्युत, जशुके., से.२३

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जशुके/वि/१/१५/२०२०, दि.१८/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

म.न.पा.च्या वतीने जलशुद्धीकरण केंद्र से.२३ अंतर्गत नागरिकांना पाणीपुरवठा सुरळित करणेसाठीपाणी पुरवठा विभागाच्या मागणीनुसार विविध पंप हाऊसमध्ये पंपिंग मशिनरी बसविणे, त्यासाठी वीजपुरवठा घेणे,पंपिंग मशिनरी वाढल्यास वाढीव वीजभार घेणे व पंपिंग मशिनरी कार्यान्वित करणे इ. स्वरूपाची कामे केली जातात. सध्या म.न.पा.चे पाणी पुरवठा विभागाअंतर्गत

रावेत स.नं ९६ येथे पंप हाऊस कार्यरत असून ग्राहक क्रमांक १७०१४९०६४७०० अन्वये थ्री फेज उच्चदाब वीज पुरवठा चालु आहे. सदर ठिकाणचा वीज वापर हा पाणी पुरवठा करणेसाठी होत असल्यामुळे, वीज पुरवठा खंडीत झालेमुळे नागरिकांना करण्यात येणा-या पाणी वितरण व्यवस्थेमधे अडथळा येत आहे. सदर ठिकाणी अखंडीतपणे पाणी पुरवठा सुरु राहणेकरीता विषयांकित ठिकाणी पर्यायी उच्चदाब वीज पुरवठा करुन मिळणे करीता म.रा.वि.वि.कं. यांचेकडे दि.२०/९/२०१९ चे अर्जान्वये मागणी केलेली होती. त्यानुसार म.रा.वि.वि.कं. यांनी त्यांचेकडील सिस्टीम जनरेटेड इस्टीमेट क्र. १२२४ दि.३/०३/२०२० अन्वये त्यास मंजूरी दिलेली आहे. सदर इस्टीमेटनुसार म.रा.वि.वि.कं. यांस सदर कामाकरीता पर्यवेक्षण शुल्क व जीएसटी इ. असे एकूण र.रू.५८,९३५/- अदा करून, सदरचे काम म.न.पा मार्फत पूर्ण करणेबाबत कळविले आहे. तथापि सदरचे काम म.रा.वि.वि.कं. यांच्या पर्यवेक्षणाखाली करणेत येत असल्याने वरील नमूद शुल्क म.रा.वि.वि.कं. यांस अदा करणे आवश्यक आहे. सदर कोटेशन शुल्क र.रु.५८,९३५/- (अक्षरी र.रू अठ्ठावन्न हजार नऊशे पस्तीस फक्त) खर्च रकमेस मा. स्थायी समिती सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. सबब रावेत स. नं. ९६ पंप हाऊस (ग्रा. क्र. १७०१४९०६४७००) येथे पर्यायी उच्चदाब वीज पुरवठा घेणेकामी पर्यवेक्षण शुल्क व जीएसटी इ. असे एकूण रक्कम रूपये ५८,९३५/- (अक्षरी र.रू अठ्ठावन्न हजार नऊशे पस्तीस फक्त) म.रा.वि.वि.कं. यांस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२०५ | विषय क्रमांक – ७

दिनांक – १०/०७/२०२० | विभाग– आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे | अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.आमुका/३/कावि/१६८/२०२०, दि.१९/०६/२०२०

मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

आरोग्य मुख्य कार्यालयाकडील सहाय्यक आरोग्याधिकारी यांचे वाहन क्र.MH-14CL-248 (टाटा सुमो)या वाहनाचे टायर खराब झालेने नवीन ट्यूबलेस टायर्स खरेदी करणेकामी मे.सीएट लि.,पुणे यांचेकडून थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदी केलेली आहेत. त्याकामी आलेल्या प्रत्यक्ष खर्च र.रु.२८,१२८/- (अक्षरी र.रु.अठ्ठावीस हजार एकशे अठ्ठावीस फक्त) यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२०६ | विषय क्रमांक – ८

दिनांक – १०/०७/२०२० | विभाग– लेखा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे | अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.लेखा/३/कावि/१०८/२०२०, दि.२२/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.२४४ कोटी (अक्षरी र.रु.दोनशे चव्वेचाळीस कोटी फक्त) तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट १३३.५८ कोटी विविध प्रकारचे पासेस र.रु.१४.५९ कोटी बसेस खरेदी र.रु.३५.८३ कोटी व ई बस सबसिडी ६० कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून रक्कम रुपये ९ कोटी संचलनतूट व सवलतीचे पासेसपोटी र.रु.६९ लाख असे र.रु.०९.६९ कोटी (अक्षरी र.रु.नऊ कोटी एकोणसत्तर लाख फक्त) सन २०१९-२० च्या अंदाजित संचलन तूटीचे लेखापरिक्षण होऊन तूट कायम होईपर्यंत माहे जून २०२० चे अदा करावयाचे असल्याने व सदर बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२०७ विषय क्रमांक – ९
दिनांक – १०/०७/२०२० विभाग– वैद्यकिय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचेकडील पत्र क्र.मसाभां/४/कावि/४४६/२०२०, दि.२२/०६/२०२०

मा.अति. आयुक्त(१) यांची शिफारस विचारात घेवून –

मनपा रूग्णालयातील कोरोना विषाणू बाधित रूग्णांना आहार पुरविणेकामी दिंनाक १३/२/२०२० रोजीच्या प्रस्तावास मा.अति.आयुक्त सो. यांनी मे.क्वॉलिटी केटर्स यांना जननी शिशु सुरक्षा योजनेअंतर्गत गरोदर माताना देण्यात येणारा आहार त्याच दराने कोरोना रुग्णास देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्या प्रमाणे मे.क्वालीटी केटरर्स यांना पुरवठा आदेश क्र.मसाभां/२/कावि/१/२०१८ दि.०३.०१.२०१८ अन्वये र.रु.१००/- प्रमाणे आदेश देणेत आलेले होते. त्याचे बिल दिनांक ०१.०३.२०२०/ १३.०४.२०२० पर्यंत र.रु.१,९२,०००/- चे खर्चास मान्यता घेणे आवश्यक आहे.परंतू सदर दर रास्त नसलेने तसेच आहारामध्ये बदल करणेत आलेने मा.आयुक्त यांचे दिनांक ३०.०३.२०२० चे प्रस्तावास र.रु.१५०/- एक दिवसाचा आहार यास मान्यता दिलेली आहे. या दरा प्रमाणे त्यांना पुरवठा आदेश क्र.मसाभां/२/कावि/२४७/२०२० दि.३०.०३.२०२० रोजी र.रु.१५०/- प्रमाणे आदेश देणेत आलेले आहेत. या प्रमाणे र.रु.८,३१,३१०/- चे खर्चास मान्यता घेणे आवश्यक आहे. मा.अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी जेवणाचे पॅकींग चांगल्या दर्जाचे तसेच १ अतिरीक्त भाजी देणेसंबंधी सूचना केलेल्या होत्या त्या प्रमाणे मा.आयुक्तसो यांनी दिनांक १४.०४.२०२० चे प्रस्तावास जेवणाचा दर र.रु.१५०/- ऐवजी र.रु.२५०/- देणेस मान्यता दिलेली आहे. सबब, जेवणाचा दर र.रु.१०० प्रमाणे एकूण खर्च र.रु.१,९२,०००/- र.रु.१५०/- प्रमाणे एकूण र.रु.८,३१,३१०/- आणि र.रु.२५० प्रमाणे एकूण खर्च र.रू.४०,००,००० अंदाजे खर्च असे एकूण र.रु.५०,००,०००/- (अक्षरी र.रू.पन्नास लाख फक्त) किंवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता व संबंधीतांशी कार्योत्तर करारनामा करणेस मान्यता देणेबाबत मा.अति. आयुक्त(१) यांची मागणी असली तरी, प्रस्तुत कामासाठी र.रू.५०,००,०००/- (अक्षरी र.रू.पन्नास लाख फक्त) पर्यंतचे खर्चास मान्यता देणेत येत आहे. त्यापुढे खर्च झाल्यास मान्यतेसाठी स्वतंत्र प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस मान्यता

देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२०८ विषय क्रमांक – १०

दिनांक – १०/०७/२०२० विभाग– माध्यमिक शिक्षण

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचेकडील पत्र क्र.माध्य/शि/३/कावि/९७/२०२०, दि.२४/०६/२०२०

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाच्या माध्यमिक विद्यालयातील सन २०२०-२०२१ चा शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वी च्या मराठी, इंग्रजी, ऊर्दु माध्यमासाठी एकुण ४१०६८ क्रमिक पुस्तके थेट पध्दतीने खरेदीकामी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे यांना आगाऊ र.रू.२१,९९,१५३/- (अक्षरी र.रू.एकवीस लाख नव्याण्णव हजार एकशे त्रेपन्न फक्त) खर्चास किंवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२०९ विषय क्रमांक – ११

दिनांक – १०/०७/२०२०

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव –

विषय - मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.६३ दि.२२/०६/२०२० बाबत

विषय क्र.११ दप्तरी दाखल करणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२१० विषय क्रमांक – १२

दिनांक – १०/०७/२०२०

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.शशिकांत कदम, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव –

विषय - मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.६६ दि.२२/०६/२०२० बाबत

विषय क्र.१२ दप्तरी दाखल करणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२११ विषय क्रमांक – १३
दिनांक – १०/०७/२०२० विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचेकडील पत्र क्र.मुलेप/६/कावि/५०/२०२०, दि.२३/०६/२०२०

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम१०५(१) अन्वये लेखा परिक्षण विभागाकडील माहे मार्च, एप्रिल, मे २०२० अखेर संपणारा मासिक गोषवारा मा.मुख्य लेखा परीक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/५०/२०२०, दि.२३/०६/२०२० अन्वये पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२१२ विषय क्रमांक – १४
दिनांक – १०/०७/२०२० विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचेकडील पत्र क्र.मुलेप/६/कावि/४९/२०२०, दि.२३/०६/२०२०

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०१.०६.२०२० ते दि.१४.०६.२०२० अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/४९/२०२०, दि.२३/०६/२०२० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२१३ विषय क्रमांक – १५
दिनांक – १०/०७/२०२० विभाग – आरोग्य मुख्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आमुका/११/कावि/१४१/२०२०, दि.२५/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरात कोविड 19 या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली आहे. सदर आजाराचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी कंटेन्मेट झोन (प्रतिबंधित क्षेत्र) तसेच झोपडपट्टी भागामध्ये आरोग्याच्या सोईच्या दृष्टीने तातडीने पोर्टेबल टॉयलेट उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने, थेट पध्दतीने मे.सिक्युअर आयटी फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.ली. यांचेकडुन प्रति युनिट र.रु.१२७५/- एक दिवसा करीता या दराने एकूण २० नग पुरविणेस आदेश देणेत आले आहेत. तसेच सदर संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव किती कालावधीकरीता असेल हे सांगता येणे शक्य नसलेने, या पुढे कोविड

परिस्थितीमध्ये आवश्यकतेनुसार मागणी प्रमाणे पुरवठा करणेकामी प्रत्यक्ष होणा-या खर्चास तसेच मे.सिक्युअर आयटी फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.ली. यांचे बरोबर या कामाचा अटीशर्तीसह करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२१४ विषय क्रमांक – १६

दिनांक – १०/०७/२०२० विभाग – अ क्षेत्रिय, आरोग्य

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ –मा.क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/आ-२/कावि/२५०/२०२०, दि.२४/०६/२०२०

मा.क्षेत्रिय अधिकारी यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अ-क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभागामार्फत डेंग्यू/ मलेरिया आजारांचा प्रादु्र्भाव रोखण्यासाठी डास नियंत्रणउपाययोजना राबविणेत येतात. यामध्ये किटकनाशक औषधांची फवारणी करणे, औष्णिक धुरीकरण करणे याचा समावेश आहे. औष्णिक धुरीकण कामासाठी ३ पिक अप व्हॅन/रिक्षा टेम्पो वाहने भाड्याने पुरविणेकामी या कार्यालयाकडील निविदा नोटीस क्रमांक ९/२०१८-१९ अन्वये निविदा प्रसिद्ध करणेत आल्या होत्या. त्यास अनुसरुन प्राप्त निविदांपैकी मे. रामचंद्र एन्टरप्रायजेस, कामगारनगर, पिंपरी-४११०१८ यांनी कामाचे अंदाजपत्रकीय र.रु.६,६४,६५०/- पेक्षा १६.१७% कमी (र.रु.५,५७,१००=६५) सादर केलेला दर (र.रु.५९५=१९ प्रति वाहन प्रति दिन) सर्वात कमी असल्याने आदेश क्रमांक अक्षेका/आ.-२/कावि/६२९/२०१९ दि.०२/०७/२०१९ अन्वये त्यांची दि.०३/०७/२०१९ पासून एक वर्ष कालावधीसाठी ठेकेदार म्हणून नेमणूक करणेत आली आहे. सदर कामाची मुदत दिनांक ०२/०७/२०२० रोजी संपत आहे. सदरची निविदा कार्यवाही प्रस्तावित आहे. तथापी त्यासाठी काही कालावधी लागणार असल्याने कामाची निकड विचारात घेता सदरचे कामास मुदतवाढ देणे आवश्यक असल्याने मे.रामचंद्र एन्टरप्रायजेस यांना मान्य निविदा दराने म्हणजेच र.रु.५९५=१९ प्रति वाहन प्रतिदिन याप्रमाणे ३ वाहने दिनांक ३/७/२०२० पासून तिन महिने अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होवून कामाचे आदेश देईपर्यंतचे कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे र.रु.१,३९,२७५/- (अक्षरी र.रू.एक लाख एकोणचाळीस हजार दोनशे पंच्याहत्तर फक्त) अथवा प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.क्षेत्रिय अधिकारी यांची मागणी सली तरी, प्रस्तुत कामासाठी र.रू.१,३९,२७५/- (अक्षरी र.रू.एक लाख एकोणचाळीस हजार दोनशे पंच्याहत्तर फक्त) पर्यंचे खर्चास मान्यता देणेत येत आहे. त्यापुढे खर्च झाल्यास मान्यतेकामी स्वतंत्र प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२१५ विषय क्रमांक – १७
दिनांक – १०/०७/२०२० विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचेकडील पत्र क्र.पापु/कावि/६/२८८/२०२०, दि.२३/०६/२०२०

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते १) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२१६ विषय क्रमांक – १८
दिनांक – १०/०७/२०२० विभाग – आरोग्य मुख्यालय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आमुका/४/कावि/२१९/२०२०, दि.२५/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहरामध्ये सार्वजनिक ठिकाणी थुंकणा-या व्यक्तींवर घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अन्वये र.रु.१५०/- इतक्या रकमेचा दंड आकारणेकामी आदेश क्र.आमुका/४/ कावि/१५९/२०२० दि.११/०३/२०२० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत सार्वजनिक ठिकाणी थुंकणा-या नागरिकांविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. मा.विभागीय आयुक्त, पुणे यांनी दि.२२/०६/२०२० रोजीचे अर्धशासकीय पत्राद्वारे मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना सार्वजनिक ठिकाणी वारतांना मास्क परिधान न करणा-या व्यक्तींविरुध्द र.रु.५००/ १००० इतक्या रकमेचा दंड आकारण्याचे तसेच सार्वजनिक ठिकाणी पान, तंबाखू, गुटखा खाऊन किंवा त्याशिवायही थुंकल्यास र.रु.५००/ १००० इतक्या रकमेचा दंड आकारण्याबाबत योग्य व विहित आदेश पारित करण्याचे सूचित केलेले आहे. सद्यस्थितीत मनपामार्फत मास्क परिधान न करणा-या व्यक्तीं विरुध्द र.रु.५००/- इतक्या रकमेचा दंड आकारण्यात येत असून पिंपरी चिंचवड शहराच्या कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास आदेश क्र.आमुका/४/ कावि/१५९/२०२० दि.११/०३/२०२० अन्वये र.रु.१५०/- इतकी रक्कम दंड म्हणून आकारण्यात येत आहे. त्यामुळे मा.विभागीय आयुक्त यांनी केलेल्या सूचनेनुसार सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यापोटी आकारण्यात येणारी दंडाची रक्कम र.रु.५००/- अथवा र.रु.१०००/- पर्यंत वाढविणे आवश्यक आहे. शहरामध्ये सार्वजनिक ठिकाणी वावरतांना मास्क परिधान न करणा-या व्यक्तींविरुध्द र.रु.५००/- इतक्या रकमेचा दंड आकारण्यात येत असून शहरामध्ये वाढता कोविड–१९ विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेता नागरिकांमध्ये

सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यास प्रतिबंध करणेकामी सार्वजनिक परिसरामध्ये थुंकणा-या व्यक्तींविरुध्द र.रु.५००/- इतक्या रकमेचा दंड आकारणे आवश्यक आहे. सबब पिंपरी चिंचवड शहराच्या कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनिक ठिकाणी पान, तंबाखू, गुटखा खाऊन किंवा त्याशिवायही थुंकल्यास अशा व्यक्तींविरुध्द र.रु.५००/- इतक्या रकमेचा दंड आकारणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२१७ विषय क्रमांक – १९
दिनांक – १०/०७/२०२० विभाग – ब क्षेत्रिय, विद्युत
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/वि/चि२/७६/२०२०, दि.१९/०६/२०२०

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिके तर्फे चिंचवड येथे तालेरा रुग्णालयाची जुनी इमारत पाडुन नविन इमारतीचे विस्तारिकरण करणेचे बांधकाम चालु आहे. सदर ठिकाणी तालेरा रुग्णालयाचे इमारतीस यापुर्वी आपणातर्फे उच्च दाब विज पुरवठा करणेत आला असून मनपा एच.टी. ग्राहक क्र.१७०१४९००४३७१ असुन या पुर्वी एकुण विद्युत भार १४९५ KW /६०० KVA मंजूर आहे. परंतु नविन इमारतीच्या बांधकाम/ आराखड्या नुसार १२०० KVA चे आवश्यक्ता आहे. त्याप्रमाणे म.रा.वि.वि.कं. लि.कं. कडून प्राप्त फर्म कोटेशनचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | विज मीटरचे ठिकाण | ग्राहक क्रमांक | फर्म कोटेशन क्र.व दि. | निव्वळ देय र.रू |
|---|---|---|---|---|
| १ | तालेरा रुग्णालय,चिंचवड | १७०१४९००४३७१ | २४१७४२६६ दि.२१.१२.२०१९ | ३०१७४१० |

तरी, तालेरा रुग्णालयाचे नविन इमारतीस वाढीव विद्युत भाराचे र.रू.३०,१७,४१०/- (अक्षरी र.रू.तीस लाख सतरा हजार चारशे दहा फक्त) म.रा.वि.वि.कं.स अदा करावे लागणार असुन सदरचा खर्च हा विद्युत मुख्यकार्यालय विभागाचे स्ट्रीट लाईट बिल या लेखाशिर्षावर करण्यात आला आहे. तरी सदर कामाचे व खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२१८ विषय क्रमांक – २०
दिनांक – १०/०७/२०२० विभाग – स्थापत्य क मुख्य
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२३०/२०२०, दि.२६/०६/२०२०

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.89/1/2019-20 अन्वये प्रभाग क्र.९ येथील नेत्र रुग्णालय इमारत व इतर इमारतींसाठी फर्नीचर व्यवस्था करणे व अनुषांगिक कामे करणेकामी मे.अक्षय

मंजुभाऊ रोडे नि.र.रू.55,34,923/- (अक्षरी र.रु.पंचावन्न लाख चौतीस हजार नऊशे तेवीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.55,28,923/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.55,28,923/- पेक्षा 29.05% कमी म्हणजेच र.रु.39,22,771/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.6,000/- = एकुण र.रु.39,28,771/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२१९ विषय क्रमांक – २१

दिनांक – १०/०७/२०२० विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.अँबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.विमुका/३/कावि/६२/२०२०, दि.२६/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

माहे मार्च २०२० मध्ये जगभरात कोरोना विषाणूचा प्रसार झाल्याने लॉकडाऊन जाहीर करण्यात आले व संचारबंदी लागू करण्यात आली. सन २०१९-२० मध्ये एकूण १०५ कामांची बिले अदा करणे प्रलंबित होती. परंतु वरील आपत्कालीन परिस्थीमुळे सदरची बिले अदा करता आलेली नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागांतर्गत सन २०१९-२० मधील व त्यापूर्वीच्या चालू असलेल्या विकास कामांची बिले संबंधितांस अदा करणे आवश्यक आहे. सोबत कामनिहाय यादी जोडणेत आली आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | कामांची संख्या | अदा करावयाची र.रु. |
|---|---|---|---|
| १ | विद्युत मुख्यालय | १ | ५,६३,९७६/- |
| २ | अ मुख्यालय(वि) | ५ | २१,३६,६४३/- |
| ३ | ब मुख्यालय(वि) | ९ | ५२,३१,२३३/- |
| ४ | क मुख्यालय(वि) | १६ | १,५९,७०,३९४/- |
| ५ | ड मुख्यालय(वि) | १० | ८१,२६,०७९/- |
| ६ | ई मुख्यालय(वि) | १५ | २,२९,९३,०१७/- |
| ७ | फ मुख्यालय(वि) | २१ | २,१९,८०,९०६/- |
| ८ | ग मुख्यालय(वि) | ११ | ४४,७७,८७१/- |
| ९ | ह मुख्यालय(वि) | १२ | ५५,५४,३८२/- |
| १० | दुरसंचार | २ | ९,३७,११५/- |
| ११ | मुंबई पुणे रस्ता | ३ | ८,७६,९७१/- |
| एकूण | | १०५ | ८,८८,४८,५८७/- |

तरी वरील तक्त्यात नमूद केलेनुसार अदा करावयाच्या बिलांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०२ अन्वये मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/६५७/२०२०
दिनांक – १३/०७/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

**(क्र.पापु/कावि/०६/२८८/२०२० दि.२३/०६/२०२० विषय क्र.१७ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
पाणी पुरवठा विभाग
क्र.पापु/६/कावि/२८८/२०२०
दि.२३/०६/२०२०

प्रपत्र अ ( १ ते १)

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचे आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | 5 | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | मे महाराष्ट्र अंडर वॉटर सर्व्हीसेस | ०८/०८/२०१९-२० | अशुद्ध जलउपसा केंद्र रावेत येथील टप्पा १ ते ४ अंतर्गत संपवेलमधील गाळ काढणे. | १४/०५/२०२० | पापु/६/कावि/२२६/२०२० | १८/०५/२०२० | २१७१८७० | ३.७० % कमी | २०९१५११ |
| | | | | | | एकूण | | | २०९१५११ |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८